# मिरा भाईंदर महानगरपालिका

## आयुक्त कार्यालय

मुख्यालय, 2रा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी commissioner@mbmc.gov.in


MiraBhayandar @2047

जा.क्र. मनपा/आयुक्त/ 26 /2024-25 दि. 17 /12/2024

अति. आयुक्त दालन

आवक क्र. 916

दिनांक 27/12/24

**कार्यालयीन आदेश**

**विषय:-** महानगरपालिकेच्या विविध मालमत्ता (उदा. सभागृह, समाजमंदिर, मैदाने, उद्यानातील जागा, भाड्यावर द्यावयाच्या इतर जागा इ.) ऑनलाईन प्रणालीद्वारेच भाड्यावर देणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्ता उदा. सभागृह, समाजमंदिरे, मैदाने, उद्यानातील जागा, भाड्याने द्यावयाच्या इतर सर्व जागा ह्या महानगरपालिकेने ठरविलेले भाडे व धोरणानुसार प्रभाग समिती कार्यालयाकडून भाड्याने देण्याची कार्यवाही करण्यात येत असते.

सध्यस्थितीत सदरच्या मालमत्ता भाड्याने देण्याच्या प्रक्रियेसाठी महानगरपालिकेकडून संगणक प्रणाली **(mymbmc.in)** विकसित करुन कार्यान्वित करण्यात आली आहे. त्याबाबतची माहिती व प्रशिक्षण आपल्या कार्यालयास यापूर्वीच देण्यात आलेले आहे.

त्यामुळे यापुढे भाड्याने द्यावयाच्या सर्व मालमत्तांबाबतची संपूर्ण प्रक्रिया ही ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे करण्यात यावी. तसेच आपल्या कार्यालयाकडे ऑनलाईन प्रणाली व्यतिरिक्त (Offline) प्राप्त अर्जांची नोंद देखील ऑनलाईन संगणक प्रणालीमध्ये घेऊन सर्व परवानग्या ह्या ऑनलाईनच देण्यात याव्यात. सदरची कार्यवाही याद्वारे बंधनकारक करण्यात येत असून आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे.

याउपरही ऑनलाईन परवानगी न दिल्याचे निदर्शनास आल्यास आपण शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठराल, याची नोंद घ्यावी.

CE / Addl (I)

Raj Ghahat

→ Online for booking

चर्चा करा

(संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रति,**

**सहा आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी**
प्रभाग समिती कार्यालय क्र.1 ते 6, मिरा भाईंदर महानगरपालिका

Rg. Ghaw.

**प्रत माहितीसाठी :-**

1. अतिरिक्त आयुक्त (1)
2. शहर अभियंता
3. कार्यकारी अभियंता (मा.व्य.)

19/12